
ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

नदी विशेषांक

# तिफण

वर्ष : १४ वे । अंक : तिसरा - चौथा
ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०२३





**UGC Care Listed Journal**
ISSN 2231-573X
साहित्य, कला आणि
लोकसंस्कृतीला वाहिलेले

त्रैमासिक

# तिफण

नदी विशेषांक

**वर्ष :** १४ वे, **अंक :** तिसरा/चौथा
ऑक्टोबर ते डिसेंबर : २०२३

**संपादक :**
**डॉ. शिवाजी हुसे**

**संपादक मंडळ :**
डॉ. सर्जेराव जिगे, डॉ. दिलीप बिरुटे
डॉ. ताहेर पठाण, डॉ. रामचंद्र आंडे
डॉ. सुभाष बागल, डॉ. दत्तात्रय डुंबरे
डॉ. सुभाष शेकडे, डॉ. सुखदेव ढाकणे
डॉ. प्रेमला मुखेडकर, डॉ. राजकुमार
डॉ. रंजना कदम, डॉ. यशवंत सोनुने

**मुखपृष्ठ :** निसर्ग ग्राफिक्स
(छायाचित्र व कवितेच्या ओळी : अ
मुद्रक : रुद्रायणी, छत्रपती संभाजीनगर.

**अक्षरजुळणी, मांडणी व सजावट :**
मंदार नागरे, छत्रपती संभाजीनगर
मो. ९४०४६११५९६

**• वर्गणी •**
वार्षिक सहयोग मूल्य : रु. ५००/-

**वर्गणी अशीही भरता येईल–**
संपादक, 'तिफण', बँक ऑफ महाराष्ट्र
शाखा : कन्नड, खाते क्र. 60287405377
आय.एफ.एस.सी. कोड क्र. MAHB00002

**स्वागत मूल्य : ४५० रुपये**

**संपादन :** अवैतनिक

**साहित्य व वर्गणी** पाठविण्याचा पत्ता :
डॉ. शिवाजी हुसे, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड- ४३१ १०३,
जि. छत्रपती संभाजीनगर. मो. ९४०४०००३
Email : tiphanmasik@gmail.com

(या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


**• नदी विशेषांक •**

संपादकीय ... ०९

नदी समजून घेताना ... ११

माझी सिंदफणा नदी : एक भळभळती जखम ... १४

नदी आणि संस्कृती ... १८

'नदी संदर्भ' समाज संस्कृतीचे उत्थान ... २१

नद्या : भारतीय संस्कृतीच्या पाऊलखुणा ... २६

नदी – लोकमाता ... ३५

जीवनदायिनी नदी ... ४३

नदीकाठ आणि मी ... ४७

मी नर्मदापूत्र ... ५६

१०. नदी देवता व शिल्प ... ६४

११. नदी, ताई आणि मी ... ७०

१२. वारसा नदीचा ... ७५

१३. कमलदलाचे जलबिंदू ... ८०

१४. स्वप्न सत्यात उतरवायचंय ... ८४

१५. जगुबा धनगर ... ८८

१६. मानवी जीवन व वाङ्मयातील नदीचे स्थान ... ९१

१७. वर्धा नदीच्या परिप्रेक्ष्यातील मानवी जीवन ... ९६

१८. गाहासत्तसई (गाथासप्तशती) या ग्रंथातील नद्या आणि त्यांचे संदर्भ ... १०१

१९. मानवी जीवनाच्या पुनर्रचनेत नद्यांचे योगदान : एक दृष्टीक्षेप ... १०९

२०. संत तुकारामांची नदी विषयक सुभाषिते ... ११४

२१. कवीच्या दृष्टीक्षेपातील नदी ... ११९

२२. आजोळची जीवनदायिनी : चिखली ... १२३

२३. माणदेशाची वरदायीनी माणगंगा नदी .... १२८

२४. मीना नदी : शुष्क प्रदेशातील जीवनदायिनी ... १३५

२५. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जीवनदायिनी कर्ली नदीची स्थिती ... १४०

२६. भारतीय संस्कृती आणि 'यमुना' ... १४६

२७. नमामि चंद्रभागा ! ... १५२

२८. नाईल नदी व इजिप्त... नेत्रसुखद अनुभूती ... १५६

२९. गोदावरी नदी : जैविक शुद्धीकरण ... १५९

३०. पाणी, कप टाकून आणि आपण ... १६२

३१. धुरी : आपत्ती निवारण ... १६७

३२. सोन्याचा धूर, कारखान्यातून नव्हे; तर जलविकासातून ... १७०

३३. जल सुरक्षा : भारतातील समस्या आणि आव्हाने ... १८०

३४. नदी प्रदूषण : एक घातक समस्या ... १९१

३५. सरस्वती नदीचे श्रीगोंदा तालुक्यातील योगदान ... १९३

३६. नदी, पर्जन्यमान आणि दुष्काळ : यातील परस्पर संबंध ... २०३

३७. मुसी नदी: जीवनाच्या स्त्रोतापासून ड्रेनेजपर्यंत ... २०८

३८. 'मानवलोक' स्वयंसेवी संस्थेची नदी संवाद यात्रा - एक अनुभव ... २१५

३९. दुष्काळमुक्त महाराष्ट्रासाठी 'जल आराखडा' ... २२५

४०. नदीच्या स्त्रीत्वाचा वेध घेत महाराष्ट्रातील नद्यांचे धार्मिक महत्त्व उद्धृत करणारे 'नदी आणि स्त्रीत्व' ... २३१

४१. गोंदच्या किनाऱ्यावरचं समृद्ध, प्रवाही, प्रांजळ जग : 'नदीष्ट' ... २३८



- डॉ. जगदीश व्यंकटराव भेलोंडे, [illegible]
[illegible] शिक्षण क्षेत्रात [illegible]

# नदी देवता व शिल्प

**जल हे मानवाच्या जीवनाचा व समृद्धीचा प्रमुख घटक होय. प्राचीन काळातील सर्व संस्कृती ह्या नदीच्या काठी विकसीत झाल्या आहेत. प्राचीन काळापासून भारतीय संस्कृती ही कृषीवर आधारीत असलेली दिसते. शेती ही पर्जन्यावर अवलंबून असल्यामुळे उत्तम पर्जन्यवृष्टी व्हावी यासाठी देवतांना प्रार्थना करण्यात येत असे. नैसर्गिक पर्जन्यवृष्टी बरोबरच मानवाने जलाचे महत्व लक्षात घेऊन कुंड, विहीरी, तलाव व बारवांच्या स्वरूपात कृत्रिम जलसाठे निर्माण केले. जल कायमस्वरूपी राहावे यासाठी पर्जन्य व जलाशयाची उपासना करण्यात येऊ लागली.**

प्रस्तावना

पाणी हा जीवनाचा प्रमुख घटक आहे. मानवी जीवनातील पाण्याचे महत्व लक्षात घेऊन त्याच्या उपलब्धीसाठी सातत्याने प्रयत्न झाले आहेत. पाण्याच्या नैसर्गिक स्रोत्राबरोबरच मानव निर्मित स्रोत्राचाही वापर केल्या जात होता. मुबलक प्रमाणात जल उपलब्ध व्हावे यासाठी देवदेवतांची निर्मिती करण्यात आली. जल हे नवसृजनतेचे प्रतीक समजून मातृत्वाच्या रूपात जल व जलस्थळाची पूजा व उपासना करण्यात येऊ लागली. भारतीय संस्कृती ही कृतज्ञता व्यक्त करणारी आहे. जिच्यामुळे आपल्या जीवनात समृद्धी निर्माण होते अशा नदीची देवता समजून पूजा करण्याबरोबरच नदी देवतांच्या मूर्तीशिल्पांची निर्मि

करण्यात येऊ लागली. देशातील प्रमुख नद्यांच्या नदीदेवता मूर्तीशील्पांची निर्मिती करण्यात आली. त्या नदीदेवता व त्यांच्या मूर्तीशील्पांची मांडणी प्रस्तुत शोध निबंधाच्या माध्यमातून करण्यात आली आहे.

### जल संस्कृती

जल हे मानवाच्या जीवनाचा व समृद्धीचा प्रमुख घटक होय. प्राचीन काळातील सर्व संस्कृती ह्या नदीच्या काठी विकसीत झाल्या आहेत. प्राचीन काळापासून भारतीय संस्कृती ही कृषीवर आधारीत असलेली दिसते. शेती ही पर्जन्यावर अवलंबून असल्यामुळे उत्तम पर्जन्यवृष्टी व्हावी यासाठी देवतांना प्रार्थना करण्यात येत असे. नैसर्गिक पर्जन्यवृष्टी बरोबरच मानवाने जलाचे महत्व लक्षात घेऊन कुंड, विहीरी, तलाव व बारवांच्या स्वरूपात कृत्रिम जलसाठे निर्माण केले. जल कायमस्वरूपी राहावे यासाठी पर्जन्य व जलाशयाची उपासना करण्यात येऊ लागली. जलामुळे मानवी जीवनामध्ये आमुलाग्र बदल झाला. मानवाच्या जीवनात समृद्धी व सुबद्धता आली.

### जल देवता

पाण्याचा किंवा पर्जन्याचा संबंध प्रजननाशी जोडण्यात येऊन मातृकाच्या रूपात जलदेवतांची निर्मीती करण्यात आली. ज्याप्रमाणे नैसर्गिक पर्जन्यासाठी जलदेवतांची निर्माती करण्यात आली. त्याप्रमाणे कृत्रीम जलाशयावरही मातृका किंवा जलदेवतांची उपासना किंवा पूजा करण्यात येऊ लागली. कुंड, विहीरी, तलाव, बारवांमध्ये जलदेवतांची स्थापना करण्यात येऊ लागली. साती आसरा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सप्तमातृका ह्या नदी, विहीर, बारव, तलाव अशा ठिकाणी असतात. सप्तमातृकांच्या नावामध्ये एकवाक्यता आढळत नाही वामनपुराणामध्ये 'ब्रह्माणी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी वाराही, माहेंद्री व नारसिंही यांचा सप्तमातृका म्हणुन उल्लेख आहे. तर देवी भागवतात ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी आणि चामुंडा या बरोबरच आठवी माता म्हणुन लक्ष्मीचा उल्लेख आलेला आहे.'

आसरांना पुजण्याची परंपरा आजही असल्याचे दिसते. नविन धान्य येते त्यावेळेस नदीची पूजा केली जाते. नविन धान्याच्या कनकेपासून नैवेद्य व दिवे तयार करून आंबाडीच्या काड्यांचा ताफा किंवा परडी तयार करून त्यावर नैवेद्य व दिवे ठेऊन नदीला अर्पण केले जाते शिवाय नदी काठी पाच किंवा सात दगडाचे खडे ठेऊन त्याची हळद व कुंकवाने पूजा केली जाते व नविन धान्याच्या कणकेच्या पिठापासून नैवेद्य तयार करून दगडाच्या खडयाने बनवलेल्या देवतांना व नदीला अर्पण केले जाते. हे पाऊसाने व नदीने शेतीच्या समृद्धीसाठी दिलेल्या योगदाना बद्दल त्यांच्या विषयी कृतज्ञताच व्यक्त करणे होय. डॉ.नीरज साळुंखे यांच्या मते, 'परडी सोडण्याची ही परंपरा उत्खनात मिळालेल्या लघुपुष्कराशी संबंधीत असून अशा प्रकारचे लघुपुष्कर पाण्यामध्ये सोडले जात होते.'[१] साती आसरा ज्याप्रमाणे समृद्धी व सुबद्धतेसाठी महत्वपुर्ण आहेत त्याप्रमाणे ते रक्षक असल्याचेही मानल्या जाते. गावामध्ये किंवा एखादी व्यक्ति किंवा मुल आजारी असल्यास त्याचे आजारपण दुर होण्यासाठी आसरांना नवस करण्यात येत असे. बाळांत झालेल्या स्त्रीने घराबाहेर किंवा रूमबाहेर पडत असताना जल पुजन करण्याचीही प्रथा आहे.

### नदी देवता व शिल्प

मानवी जीवनामध्ये नद्यांचे असलेले महत्व लक्षात घेऊन मानवाने नद्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच, नद्यांची देवता समजुन पुजा-अर्चा करण्यास सुरूवात केली होती. ऋग्वेदामधील नदीसुक्तामध्ये नद्यांची स्तुती करण्यात आली. नद्यांची प्रतिकात्मक पूजा करण्याबरोबरच मानवी प्रतिमेच्या रूपात नद्यांची उपासना करण्यात येऊ लागली. देशामध्ये अनेक छोट्या मोठ्या नद्या असून त्या त्या भागात त्या नद्यांची पूजा होत असते. या सर्व नद्यांपैकी कांही मोठ्या



आहे. गंगा व यमुनेच्या हाती घट दाखवलेला आहे. गंगा व यमुनेच्या मूर्तिशिल्पांची निर्मीती द्वारशाखांवर का करण्यात आली असेल या विषयी डॉ. भाग्यश्री पाटसकर म्हणतात. 'गंगा व यमुना पवित्र्य व भक्ति चे स्मरण करून देतात व पवित्र मनाने भक्ति करत असताना सरस्वतीसारखे अबोल, मनोमन समर्पण हवे'[६] मंदिरात जेव्हा गाभा-यामध्ये प्रवेश करणा-या भाविकांना याची जाणीव करून देण्यासाठी गंगा व यमुनेच्या मूर्तिशिल्पाची निर्मीती करण्यात आली.

## सरस्वती नदी व शिल्प

सरस्वती नदी ही भारतातील प्रमुख नदी होती. ही नदी आज लुप्त झालेली आहे. प्राचीन काळी सरस्वती नदी अस्तीत्वात होती. तत्कालीन साहित्यातून प्रस्तुत नदीचा उल्लेख आलेला आहे. ऋग्वेदात सरस्वती सूक्तातून या नदीची माहिती दिली आहे. सरस्वती पुराणामध्ये सरस्वतीच्या पृथ्वीवर अवतारण्या संदर्भात अशा प्रकारे कथा सांगण्यात येते की, 'दधीची ऋषी व सुभद्रा पुत्र पिपलाद दधीची यास देवतांनी मारले होते हे पिपलाद यास समजल्यानंतर त्याने देवतांना मारण्यासाठी तप केले. साधनापूर्ण होताच त्याने मांडीला घर्षण करून वडवानलाग्निला जन्म दिला व त्यास देवतांना भस्म करण्याविषयी सांगण्यात आले. तेव्हा देवांनी विष्णूला रक्षणासाठी विनंती केली. विष्णूदेवते मुळे वडवानलाग्नि जलदेवतेच्या स्थानीजाण्यास तयार झाला. यासाठी त्याचे यान म्हणून विष्णूने सरस्वतीला पश्चिमेच्या क्षीरसागराकडे घेऊन जाण्याची विनंती केली. त्याप्रमाणे सरस्वती हिमालयातील उर्वगा आश्रमातील पिंपळ वृक्षामधून नदी स्वरुपात भूलोकावर प्रगट झाली.'[७] अशा या सरस्वतीचे वर्णन वेगवेगळ्या ग्रंथातून येते. सरस्वतीचे नदी देवता, संगीत व नृत्याची देवता, विद्देची देवता म्हणून वर्णन आले असले तरी नदी देवता म्हणून तिच्या मूर्तीचे वेगळे वर्णन केलेले नाही. सरस्वती मूर्तीशिल्पाविषयी स्कंदपुराणात सरस्वतीचे वर्णन करताना म्हटले आहे, "ती जटामुकुटधारी, त्यावर चंद्रकोर, नीलकंठी, त्रिनेत्री आहे आणि कमळावर आसीन आहे."[८] तर वायुपुराणानुसार सरस्वतीची प्रतिमा 'चतुर्भुज, अतिशुभ्र वस्त्रधारी, कमलासनस्थ किंवा हंसारूढ अशी बनवावी आणि तिचा खालील उजव्या हात वरद मुद्रेत असावा. तर वरील उजव्या हातात अक्षमाला देऊन, देवीच्या वरील डाव्या हातात वीणा तर, खालील डाव्या हातात पुस्तक अथवा कमांडलू दिलेले असावे.'[९] सरस्वतीची वाहने वेगवेगळे सांगण्यात

मानव कृतज्ञता व्यक्त करत असतो.

संदर्भ

१. डॉ. साळुंखे नीरज- दैत्य बळी व कुंतलदेश महाराष्ट्र-लोकायत प्रकाशन, सातारा- पृ. ४३-४४
२. https;hi.mc.wikipedia.org
३. पं.जोशी महादेवशास्त्री -भारतीय संस्कृतीकोश खंड २ भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे द्वितीय आवृत्ती १९०६ पृ.६७२
४. पं.जोशी महादेवशास्त्री -भारतीय संस्कृतीकोश -खंड ७ भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे – प्रथमावृत्ती १९७२ -पृ.५८३
५. रायकृष्णदास -भारतीय मूर्तिकला- नागरी प्रचारिणी सभा, काशी २००६ पृ.१०४
६. डॉ.काळे -पाटसकर भाग्यश्री -महाराष्ट्राची मंदिर शैली-डायमंड पब्लिकेशन,पुणे - पृ.५२
७. अहिरराव प्र. रा. -सरस्वती पुराण – वरदा प्रकाशन, पुणे- पृ.३१
८. म्हैसेकर प्रदिप -भारतीय मूर्तिशास्त्र- विद्याबुक प्रकाशन, औरंगाबाद- पृ. ४७०
९. डॉ. देशमुख किरण, डॉ, जगदाळे दत्तात्रय -महादेव्ये नमोनमः -निर्मल प्रकाशन नांदेड .पृ १२६
१०. Balabantaray Suresh-Sixty four Yogini Temple Hirapur– Vishwamukti Publications Bhubaneshwar- 2005 p.51
११. https://vishwakosh.marathi.gov.in/16767/
१२. Balabantaray Suresh-Sixty four Yogini Temple Hirapur– p.72

•••

- डॉ. जगदीश व्यंकटराव भेलोंडे
इतिहास विभागप्रमुख, शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड
जि. छत्रपती संभाजीनगर
मो.नं. ९८६०१७१९९८
E- mail :
jayeshbhelonde2008@gmail.com